शैक्षणिक संस्थांमध्ये सुरू केलेला
महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र
अभ्यासक्रम कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान
महामंडळ, मर्यादित यांच्याकडे हस्तांतरीत
करण्याबाबत

३४५
९५।२

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.मातंत्र ३७००/(२२३/२०००)/तांशि-३

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.

दिनांक : ६ फेब्रुवारी,२००२.

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.मातंत्र ३७००/(१३२/२०००)/तांशि-३, दि.३.१०.२००० व १३.१०.२०००

२) शासन निर्णय क्र.मातंत्र ३७००/(१३२/२०००)/भाग-इ/तांशि-३, दि.२५.६.२००१

३) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मातंत्र ३७००/(१३२/२०००)/ भाग-ड /तांशि-३, दि.६ जून,२००१.

४) शासन निर्णय समक्रमांक, दि.२३.१.२००२

## शासन निर्णय:-

शासनाने वरील संदर्भ क्र.१ अन्वये राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणारी विविध महाविद्यालये, तंत्रनिकेतने व औद्योगिक प्रशिक्षण संस्था मध्ये खाजगी/अभिमत दर्जा प्राप्त ट्रेनिंग प्रोव्हायडरमार्फत नेटवर्क ॲक्सेस सेंटर (N.A.C.)ची स्थापना करून त्याद्वारे संस्थेतील विद्यार्थी व शिक्षकांकरिता महाराष्ट्र राज्य माहिती तंत्रज्ञान प्रमाणपत्र अभ्यासक्रम (M.S.C.I.T. व M.S.A.C.I.T.) वरील सुरू करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत. या कार्यक्रमाची रितसरपणे अंमलबजावणी करण्याच्या उदिष्टाने संबंधित शैक्षणिक संस्था, संचालनालय व ट्रेनिंग प्रोव्हायडर यांच्या दरम्यान त्रिपक्षीय करार देखील करण्यात आलेला आहे.

सदर त्रिपक्षीय करारातील General Clauses मधील अ.क्र.७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासनाने वरील संदर्भ क्र.२ अन्वये महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित ची स्थापना केली आहे. यामुळे त्रिपक्षीय करारातील वरील तरतुदीनुसार सदर कार्यक्रम महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्याकडे या आदेशान्वये दि.१.४.२००२ पासून हस्तांतरीत करण्यात येत आहे. तथापि, वरील संदर्भ क्र.४ अन्वये या कार्यक्रमांतर्गत शैक्षणिक संस्थेस वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या रकमेच्या विनियोगाबाबतचे आदेश अबाधित राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्र. ह. क्षीरसागर )
शासनाचे सहसचिव.

प्रति,

- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, १ला मजला, व्यवसाय शिक्षण संचालनालय, इमारत, ३ महापालिका मार्ग, एलफिन्स्टन टेक्नीकल हायस्कूल परिसर, मुंबई-१.

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.

सर्व प्राचार्य शासकीय महाविद्यालये/तंत्रनिकेतने/औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संबंधित संचालकांमार्फत)

प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव(लेखा व कोषागार), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव(व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, उद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग),

सचिव, वैद्यकीय शिक्षण, मंत्रालय, मुंबई.

सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.

संचालक, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग

विकास आयुक्त, उद्योग संचालनालय,

सर्व मंत्रालयीन विभाग

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी (पत्राद्वारे)

उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव.

उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने.

मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.

मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.

मा.प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहाय्यक.

मा.प्रधान सचिव (माहिती व तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन विभाग यांचे स्वीय सहाय्यक.

सर्व ट्रेनिंग प्रोव्हायडर्स

निवडनस्ती/तांशि-३.